**व्याख्या** **जोडपत्र ३**

अन्यथा संदर्भ नसल्यास ह्या मार्गदर्शक तत्वांमध्येः

१) 'कॉल मनी' म्हणजे, ओव्हरनाईट फंडांमधील व्यवहार
२) 'नोटिस मनी' म्हणजे, २-१४ दिवसांसाठी निधीमधील व्यवहार
३) 'टर्म मनी' म्हणजे, १५ दिवस ते १ वर्षासाठी केलेले निधीमधील व्यवहार
४) 'पंधरवडा' हा अहवाल पाठविण्याच्या शुक्रवारच्या धर्तीवर असेल व त्याचा कालावधी शनिवार ते पुढील दुसऱ्या शुक्रवारपर्यंत (दोन्हीही दिवस समाविष्ट) असेल.
५) 'बँक' किंवा 'बँकिंग कंपनी' म्हणजे, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९(१९४९ चा १०) च्या कलम ५ च्या खंड (क) मध्ये व्याख्या केलेली बँकिंग कंपनी (एनडी) मध्ये व्याख्या अनुक्रमे खंड (डीए), खंड(एनसी) आणि खंड (एनडी) मध्ये व्याख्या केल्यानुसार 'कॉरेस्पाँडिंग न्यु बँक', भारतीय स्टेट बँक' किंवा 'सबसिडिअरी बँक', (ह्या अधिनियमाच्या कलम ५६ सह वाचित) असेल.
६) 'अनुसूचित बँक' म्हणजे, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ च्या दुसऱ्या शेड्युलमध्ये समाविष्ट केलेली बँक
७) 'प्राथमिक डीलर (पीडी)' म्हणजे, 'गाईडलाईन्स फॉर पीडीज् इन गव्हर्मेंट सिक्युरिटी मार्केट्स' दि. मार्च २९, १९९५ (वेळोवेळी सुधारित) अनुसार रिझर्व बँकेने एक पीडी म्हणून वैध प्राधिकृत पत्र दिलेली वित्तीय संस्था.
८) 'भाडवली निधी' म्हणजे, त्या संस्थेच्या अगदी अलिकडील ऑडिटेड ताळेबंदातील टियर १ व टियर २ भांडवलांची बेरीज.
९) आरबीआय अधिनियम १९३४ अनुसार पीडींसाठी एनओएफ पुढीलप्रमाणे काढला जातो (अ) त्या कंपनीच्या अलिकडील ताळेबंदामध्ये दाखविलेल्या एकूण भरणा झालेले इक्विटी भांडवल व मुक्त राखीव निधी वजा-(१) संचयित बॅलन्स ऑफ लॉस (२) डिफर्ड रेव्हेन्यु एक्सपेंडिचर आणि (३) इतर अमूर्त ॲसेट्स आणि (ब) ह्याशिवाय वजा पुढील रक्कम-(१) त्या कंपनीची- (१) दुय्यम कंपनीतील गुंतवणुक (२) त्याच गटातील कंपन्यांमधील गुंतवणुक